**निशाणी २४ सोबत**

**<u>अभियोगपक्षातर्फे सा.क्र. ३ याची जबानी</u>**
**<u>मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,</u>**

माझे नाव – शिवाजी माधव जाधव, वय – ३६ वर्षे,
व्यवसाय – नोकरी, राहणार – दिवा,
तालुका – ठाणे, जिल्हा – ठाणे.

**<u>सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत</u> –**

१. मी कोतुळ बोरी येथे शेती वाट्याने करत होतो. घटना सन २०२१–२०२२ मध्ये घडली होती. मी सन २०२१–२०२२ मध्ये विवेक पानसरे यांची शेती वाट्याने करत होतो. घटना किती वाजता व कुठे घडली हे मला माहीती नाही. घटनेबाबत मला काही माहीती नाही.

*(साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास भारतीय साक्षीपुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.)*

**<u>उलटतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत</u> –**

२. हे म्हणणे खरे आहे की, रुपेश देशमुख हा शैलजा पानसरे यांच्या शेतीची देखभाल करत होता. हे म्हणणे खरे आहे की, शैलजा पानसरे यांच्या शेतीच्या बाजूला दत्तात्रय पानसरे यांची शेतजमीन असून शेतीच्या बांधावर दगड मातीची टेकडी आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २४.०९.२०२१ रोजी सकाळी ११:३० च्या सुमारास मी टेकडीवर काम करत होतो, त्यावेळी रुपेश देशमुख हा झाडे लावण्यासाठी खड्डे घेत होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आरोपी हे त्याला म्हणाले की, जमिनीत खड्डे

खोदू नका, ही जागा आमची आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिपक त्यांना म्हणाला की, जमिनीची मोजणी झाल्यानंतर हद्द फिक्स होईल. हे म्हणणे खरे नाही की, त्याने काम बंद करून शैलजा पानसरे यांना फोन केला व सदरचा प्रकार सांगितला. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर रुपेश याने मला त्याने पोलीस स्टेशनला अर्ज केल्याचे सांगितले.

३. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर रुपेश घरी निघून गेला. हे म्हणणे खरे नाही की, संध्याकाळी ०८:०० वाजण्याच्या सुमारास आरोपी हे टेकडी पॉकलेंडच्या साहाय्याने खोदत होते. हे म्हणणे खरे नाही की, शैलजा पानसरे यांच्या शेतीत अतिक्रमण करून बांधकामास धोका पोहोचवण्याच्या हेतुने मुरमाचे उत्खनन केले. हे म्हणणे खरे नाही की, घडलेला प्रकार मी रूपेश देशमुख यांना फोन करून सांगितला. हे म्हणणे खरे नाही की, रुपेश याने येवून पाहीले व आरोपी यांना समज दिली.

४. हे म्हणणे खरे नाही की, रात्री १०:३० वाजता रूपेश याची आई शोभा हिने रुपेश यास फोन करून कळविले की, आरोपी आपल्या घरासमोर आले व म्हणाले की, तुमच्या मुलाने आमच्या वर पोलीस केस केली आहे, तो जास्त वाढीवपणा करतोय त्याला समजावून सांगा अशी दमबाजी केली. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझा जबाब नोंदवला होता.

५. आता मला माझ्या जबाबातील अधोरेखांकित भाग 'अ' मधील मजकुर वाचुन दाखवण्यात आला. तो मी पोलिसांना सांगितला नव्हता. पोलिसांनी तो माझ्या जबाबामध्ये का नमुद केला याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्यामध्ये व आरोपींमध्ये न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्यामध्ये

तडजोड झाली असल्यामुळे आरोपीस शिक्षा होऊ नये म्हणुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. ए. के. धुमाळ यांच्या मार्फत</u> –**

उलटतपास नाकारला.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2025.09.29 17:15:57 +0530

दिनांक २९.०९.२०२५
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
कोर्ट नं. २, अकोले .